# जाहिरात

## महाराष्ट्र शासन

## महिला व बाल विकास आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत

## महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणे

मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी जनहीत याचिका क्र ५७/२०१६ प्रकरणी दिलेल्या निर्देशानुसार तसेच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियमातील कलम ४३ (१) आणि महाराष्ट्र राज्य (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ मधील तरतुदींनुसार राज्यामध्ये बृन्ममुंबई महानगरपालिका, पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नागपुर महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, कल्याण-डोंबवली महानगरपालिका, नवी मुंबई महानगरपालिका, मिरा- भायंदर महानगरपालिका, भिंवडी- निझमपुर महानगरपालिका, उल्हासनगर महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका, मालेगाव महानगरपालिका, वसई-विरार महानगरपालिका, औरंगाबाद महानगरपालिका, सोलापूर महानगरपालिका, अमरावती महानगरपालिका, नांदेड - वाघोली महानगरपालिका, कोल्हापुर महानगरपालिका, अकोला महानगरपालिका, पनवेल महानगरपालिका, सांगली-मिरज- कुपवाड महानगरपालिका, जळगाव महानगरपालिका, लातुर महानगरपालिका, धुळे महानगरपालिका, अहमदनगर महानगरपालिका, चंद्रपुर महानगरपालिका, परभणी महानगरपालिका, या महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यावरील बालकांच्या पुनर्वसनासाठी खुली निवारागृहे (OpenShelter) स्थापन करण्यात येणार आहेत. याकरीता खुले निवारागृह (OpenShelter) चालविण्यासाठी राज्यातील स्वयंसेवी संस्थांकडून खालील अटी शर्तींच्या आधारे प्रस्ताव ३ प्रतीत मागविण्यात येत आहे.

**अटी व शर्ती:**

१. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४३ (१) आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ अन्वये खुले निवारागृह मान्यतेसाठीचा अर्ज स्वतंत्र कागदपत्रांसोबत सादर करणे आवश्यक राहील. नोंदणी प्रमाणपत्र आणि खुले निवारागृह मान्यतेसाठी दोन स्वंतत्र अर्ज करणे आवश्यक राहील. पहिला अर्ज नोंदणी प्रमाणपत्रासाठी व दुसरा अर्ज खुले निवारागृह मान्यतेसाठी करण्यात यावा

२. संस्था नोंदणी अधिनियमा अंतर्गत किमान ३ वर्षापुर्वीची नोदणीकृत असावी

३. खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी संस्थेकडे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र घेणे अनिवार्य राहील. सदरचे नोंदणी प्रमाणपत्र असल्याशिवाय संस्थेला खुली निवारागृहे (OpenShelter) चालविता येणार नाही जर संस्थेकडे असे प्रमाणपत्र नसेल तर संस्थेने या अर्जासोबतच बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४१ (१) अंतर्गत नोंदणीसाठी अर्ज करावयाचा आहे.

४. संस्थेकडे बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम व नियमातील तरतुदीनुसार सोयी सुविधा उपलब्ध असाव्यात

५. खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्याकरीता संस्थेकडे पुरेसा निधी उपलब्ध असावा केवळ शासनाच्या अनुदानावर संस्था अवलंबुन नसावी

६. संस्थेत दाखल होणाऱ्या बालकांना त्यांच्या कुटुंबात प्राधान्याने प्रस्थापित करण्याकरीता संस्थेचे आंतराष्ट्रीय, आंतरराज्यीय आणि स्थानिक शासकीय व अशासकीय यंत्रणांसोबत सहकार्याचे संबध असावेत.

७. संस्था बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम, एकात्मिक बाल संरक्षण योजनेच्या मार्गदर्शक तत्वाचं पालन आणि बालकांच्या हक्कांचे संरक्षण करणारी असावी

८. संस्था निती आयोगाकडे नोंदणीकृत असावी

९. खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी प्रस्तावास मान्यता देण्याचा किंवा मान्यता देण्याच्या प्रक्रीयेत अंशत: बदल करण्याचा किंवा प्रक्रीया रद्द करण्याचा संपूर्ण अधिकार शासनाचा राहील.

१०. दिनांक १९ एप्रिल २०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहीरातीनुसार खुली निवारागृहे

(OpenShelter) चालविण्यासाठी मान्यता देण्याकरीताची प्रक्रीया रद्द करण्यात आलेली असून सदर जाहिरातीनुसार प्रस्ताव सादर केलेल्या स्वयंसेवी संस्थांना पुनश्च प्रस्ताव सादर करता येईल.

११. संस्थेला बालकामगार / रस्त्यावरील बालकासोबत काम करण्याचा अनुभव असावा.

१२. प्रस्तावामध्ये तृटी आढळून आल्याने संस्थेचा प्रस्ताव नाकारण्यात आल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थेची राहील.

१३. संस्थेला शासनाचे अनुदानाची आवश्यकता असल्यास संस्थेला मान्यता मिळाल्यानंतर केंद्र शासनाच्या एकात्मिक बाल संरक्षण योजने अंतर्गत राज्यास उपलब्ध होणाऱ्या अनुदानातुन महाराष्ट्र बाल संरक्षण संस्थेकडून वितरीत केले जाईल. सदर अनुदान हे केंद्र शासनाकडून योजने अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधिच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येईल. अनुदान वितरणास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी राज्य शासनावर रहाणार नाही . अनुदाना अभावी बालकांना सुविधांपासून वंचित ठेवता येणार नाही. बालकांना सुविधा पुरविण्याची संपूर्ण जबाबदारी संस्थेची राहील.

सविस्तर माहितीपत्रक व अर्जाचा नमुना सबंधित जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांच्याकडे तसेच महिला व बाल विकास विभागाच्या https://womenchild.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत. अर्ज सबंधित जिल्हाच्या जिल्हा महिला व बाल व विकास अधिकारी यांचे कडे जमा करण्याची अंतीम दिनांक ३०/०७/२०१९ असेल तद्नंतर अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

(अधिक माहिती, स्पष्टीकरण व तक्रारीसाठी ईमेल- mscps.state1@gmail.com )

**डॉ. हृषिकेश यशोद ( भा.प्र.से.)**
**सदस्य सचिव**
**महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था पुणे तथा**
**आयुक्त**
**महिला व बाल महाराष्ट्र राज्य पुणे**

## खुले निवारागृह नोदंणी अर्ज व खुले निवारागृह मान्यता अर्ज करु इच्छिणा-या संस्थासाठी मार्गदर्शक सुचना

१. नोंदणी प्रमाणपत्र व खुले निवारागृह मान्यता अर्ज करु इच्छिणा-या संस्थानी जाहिरात प्रसिध्द झाल्यानंतर त्वरित सबंधित जिल्हाच्या जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांचे कार्यालयातुन अर्जाचा नमुना प्राप्त करुन घ्यावा नांदणी प्रमाणपत्रासाठीचा अर्ज महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना २७ मध्ये करण्यात यावा

२. विहीत कालावधीनंतर कोणत्याही परिस्थितीत अर्ज मिळणार नाही व कालावधी पुर्ण झाल्यानंतर स्विकारण्यात येणार नाही.

३. खुले निवारागृह चालविण्यासाठी मान्यता आणि नोंदणी प्रमाणपत्रासाठी मान्यता हे दोन स्वतंत्र प्रस्ताव कार्यालयास एकाच वेळी सादर करण्यात यावे.

४. प्रत्येक प्रस्तावा सोबत अनुक्रमणिका पान क्रमांकासह जोडण्यात यावी.

५. अर्ज स्पष्ट व सुवाच्च अक्षरांत / टाईप करण्यात यावे.

६. दोन्ही अर्ज भरण्याअगोदर जाहिरात व सुचना काळजीपुर्वक वाचाव्यात तदनंतर अर्ज भरावे.

७. दोन्हीही अर्ज प्रत्यकी चार प्रतीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालयात सादर करण्यात यावेत.

८. अर्ज सोबत जोडण्यात आलेली संस्थेची सबंधित कागदपत्रे स्वसाक्षांकित करून जोडावीत प्रत्यक पानावर संस्थेचा शिक्का असणे आवश्यक आहे

संस्थेने खालील कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

९. संस्था नोंदणी प्रमाणपत्र.

१०. संस्थेची घटना व नियमावली.

११. संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी.

१२. बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ अंतर्गत नोंदणी प्रमाणपत्र आणि खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी मान्यता घेण्याबाबत संस्थेचा ठरावाची प्रत (नोंदणी प्रमाणपत्र असल्यास फक्त खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी मान्यता घेण्याबाबतचा ठरावाची प्रत)

१३. संस्थेतील कार्यरत कर्मचारी तसेच खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी प्रस्तावित कर्मचाऱ्यांची यादी पदनाम व वेतनासह.

१४. संस्था निती आयोगाकडे नोंदणीकृत असल्याचे प्रमाणपत्र

१५. संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्र.( सन २०१८-१९ लेखा परिक्षण अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे सरप्लस किती डिफीसेट किती याबाबत विवरण जाडावे )

१६. संस्थेचा मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल.

१७. संस्थेकडील मागील ६ महिन्याचे बँक विवरण पत्र (बँकेच्या सही व शिक्क्यासह).

१८. संस्थेकडे असणाऱ्या पायाभूत सुविधांचे सविस्तर माहितीसह छायाचित्र. २५ बालकांसाठीच्या युनिट करिता कमीत कमी २००० स्क्वे. फुट क्षेत्रफळ (स्वयंपाकगृह, दोन स्नानगृह व दोन शौचालया सह)

१९. ज्या क्षेत्राकरीता खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यात येणार आहे त्या क्षेत्रामध्ये रस्त्यावरील बालकांबाबत केलेले सर्व्हेक्षण.

२०. मागील ३ वर्षामध्ये संस्थेने रस्त्यावरील बालकांच्या संदर्भात राबविलेले उपक्रम व त्याकरीता केलेल्या खर्चाचा तपशील

२१. संस्था काळया यादीत नसल्याचे तसेच संस्थेतील पदाधिका री यांचेवर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे संबधित यंत्रणेचे प्रमाणपत्र.

२२. संस्था भाडयाच्या इमारतीत असल्यास भाडे करारपत्र नोंदणीकृत असावे. संस्थेची स्वत:ची इमारत असल्यास ८ अ प्रमाणपत्र जोडण्यात यावे.

२३. दोन्ही प्रस्ताव सादर करतांना प्रत्येक पानास पान क्रमांक देण्यात यावा.

२४. संस्था इतर राज्यात नोंदणीक्कृत असल्यास त्या संबंधित राज्यांच्या धर्मदाय नोंदणी प्रमाणपत्र सादर करू शकतील . अशा राज्याबाहेरील नोंदणीकृत संस्थांनी संस्थानोंदणी प्रमाणपत्र इंग्रजी भाषेत भाषांतरीत करून जोडावे

२५. अर्जात जोडण्यात आलेले कागदपत्रे स्पष्ट व वाचण्या योग्य असावीत.

२६. अर्जात जोडण्यात आलेल्या छायाचित्रांसोबत त्यांचे विवरण जोडण्यात यावे.

२७. संस्था काळ्या यादीत नसल्याचे व संस्थेतील पदाधिकारी यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे प्रमाणपत्र पोलीस विभागाकडुन घेवून जोडण्यात यावे.

२८. परिपुर्ण आवश्यक त्या कागदपत्रासह भरलेले दोन्ही अर्ज संबंधीत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय यांच्या कार्यालयात सादर करुन त्यासंबंधी पोहोचपावती ४ प्रतीमध्ये स्वत: तयार करुन आणावी व त्यापैकी १ प्रत संबंधीत कक्षाकडून घ्यावी. उर्वेरित २ प्रती कार्यालयीन उपयोगासाठी असतील.

# खुले निवारागृह अर्ज प्रक्रियेचे वेळापत्रक.

| अ.क्र. | विवरण | कालावधी | शेरा | कार्यवाही कोण करणार |
|---|---|---|---|---|
| १ | वर्तमानपत्रात जाहीरात प्रसिद्ध व संकेतस्थळावर प्रसिध्द करणे. | ३० / ०६ /२०१९ | | महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्था, पुणे व महिला व बाल विकास विभाग |
| २ | खुले निवारागृह डेस्क व जबाबदार अधिकारी नेमणे. | २९ / ०६ /२०१९ | | सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय |
| ३ | खुले निवारागृह नोंदणी बा.न्या.अधि.कलम (४१) व खुले निवारागृह बा.न्या.अधि.कलम कलम (४३) मान्यता अर्ज वितरीत करणे. | ०१ / ०७/२०१९ ते ३०/ ०७/२०१९ (कार्यालयीन वेळेत) | | सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय |
| ४ | खुले निवारागृह नोंदणी व मान्यता अर्ज स्विकारणे. | ०२ / ०७ /२०१९ ते ३० / ०७ /२०१९ (कार्यालयीन वेळेत) | | सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय |
| ५ | विहीत मुदतीत प्राप्त झालेल्या संस्थांची यादी महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेकडे ई-मेल द्वारे पाठविणे. | ३०/ ०७ /२०१९ सायं. ६.०० वा. | अ.क्र. , संस्थेचे नांव व पत्ता, अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक - या प्रपत्रात यादी पाठवावी. | सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय |
| ५ | खुले निवारागृह अर्जप्राप्त संस्थेची प्रत्यक्ष तपासणी. | ०७/०८/२०१९ पर्यंत | जसे अर्ज प्राप्त होतील त्याप्रमाणे अर्जाची मुदत संपण्याची प्रतिक्षा न करता अर्ज प्राप्त झाल्यानंतर २ ते ३ दिवसांत जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी यांनी संस्थांची तपासणी करावी. जेणेकरुन दि. ०७/०८/२०१९ रोजी पर्यंत सर्व संस्थांची तपासणी करुन शिफारसपत्रासह प्रस्ताव महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेकडे सादर करावे. | सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय |
| ६ | विशेष दुतामार्फत सर्व प्राप्त प्रस्ताव महाराष्ट्र राज्य बाल संरक्षण संस्थेकडे सादर करावे. | दि. ०८ / ०८/२०१९ (कार्यालयीन वेळेत) | | सबंधित जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय |

## प्रस्तावासोबत संस्थेने सादर करावयाच्या पत्राचा नमुना :

**प्रती**
**मा. आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

विषय: बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४३ (१) आणि बाल न्याय मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ अन्वये खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता मान्यता मिळणेबाबत

संदर्भ : आपले विभागाची दैनिक ------------- मध्ये दिनांक ------------ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात

महोदय

उपरोक्त विषयानुसार विनंती करण्यात येते की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४३ (१) आणि बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ अन्वये खुले निवारागृह (Open Shelter) कार्यान्वीत करण्याकरीता संस्था इच्छुक असुन त्याकरीता मान्यता मिळण्याकरीता प्रस्ताव सादर करीत आहोत.

खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्यासाठी संस्थेंकडे बाल संगोपनाचा तसेच बालकांच्या प्रश्नाबाबतचा पुरेसा अनुभव असून संस्था बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४३ (१) आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुदींचे पालन करेल अशी ग्वाही देत आहे.

जाहिरातीत नमूद केलेनुसार महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील

१) नमुना क्र २७ नुसार नोंदणी प्रमाणपत्रासाठीचा अर्ज आणि २) खुले निवारागृह (Open Shelter) कार्यान्वीत करण्याकरीताचा अर्ज असे दोन स्वतंत्र अर्ज या पत्रासोबत सादर करण्यात येत आहेत. तसेच दोन्ही अर्जावर पान क्रमांक टाकण्यात आले असून आवश्यक ती सर्व कागदपत्रे संबधित अर्जासोबत जोडण्यात आलेली आहेत.

तरी विनंती की, संस्थेच्या बाल विकास क्षेत्रातील कामकाजाचा विचार करुन संस्थेला महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना क्र २७ नुसार नोंदणी प्रमाणपत्र आणि खुले निवारागृह (Open Shelter) कार्यान्वीत करण्याकरीता मान्यता देण्यात यावी ही विनंती

आपला विश्वासू

(स्वाक्षरी , पदनाम व संस्थेचा शिक्का)

**बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना :**

**प्रती**
**मा. आयुक्त**
**महिला व बाल विकास**
**महाराष्ट्र राज्य पुणे**

विषय: बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये बालकांची काळजी घेण्यारी संस्था म्हणून खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता नोंदणी प्रमाणपत्र मिळणेबाबत

संदर्भ : आपले विभागाची दैनिक ------------- मध्ये दिनांक ------------ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जाहिरात

महोदय

उपरोक्त विषयानुसार विनंती करण्यात येते की, बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये बालकांची काळजी घेणारी संस्था म्हणुन नोंदणी प्रमाणपत्र मिळणेकरीता प्रस्ताव सादर करीत आहे. आमच्या संस्थेस बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ अन्वये खुले निवारागृह (Open Shelter) कार्यान्वीत करण्याकरीता संस्था इच्छुक असुन त्याकरीता मान्यता मिळण्याकरीता आम्ही आपला प्रस्ताव आयुक्तालयास सादर करण्यात येत आहे.

संस्थेला बाल विकास क्षेत्रातील कामकाजाचा तसेच बालकांच्या प्रश्नाबाबतचा पुरेसा अनुभव असून संस्था बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील तरतुर्दींचे पालन करेल अशी ग्वाही देत आहे.

जाहिरातीत नमूद केलेनुसार महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना क्र २७ नुसार खुले निवारागृह (Open Shelter) कार्यान्वीत करण्याकरीता नोंदणी प्रमाणपत्राचा प्रस्ताव आवश्यक त्या कागदपत्रासह सादर करण्यात येत आहे. प्रस्तावावर पान क्रमांक टाकण्यात आले असून संस्थेची प्रथमिक माहिती पुढीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| संस्थेचे संपूर्ण नाव व पत्ता | |
| संस्थेच्या अध्यक्षाचे नाव व पत्ता | |
| संस्थेचे कार्यक्षेत्र | |
| संस्थेच्या स्थापनेचा दिनांक | |
| अर्जाच्या दिनांकास खात्यात असलेली रक्कम | |
| संस्थेकडील एकूण स्थावर व जंगम मालमत्ता | |
| संस्थेचा बाल विकास व संगोपन क्षेत्रातील अनुभवाचा थोडक्यात तपशील | |
| बालकांसाठी संस्था राबवित असलेले शासकीय उपक्रम व योजना यांचा तपशील | वर्ष/उपक्रम/योजनेचे नाव/एकूण खर्च/लाभार्थी संख्या//उपक्रम/योजने बाबत थोडक्यात माहिती |

तरी विनंती की, संस्थेच्या बाल विकास क्षेत्रातील कामकाजाचा विचार करुन संस्थेला बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ मधील कलम ४१ अन्वये खुले निवारागृह (Open Shelter) कार्यान्वीत करण्याकरीता नोंदणी प्रमाणपत्र मान्यता देण्यात यावी ही विनंती

आपला विश्वासू
(स्वाक्षरी , पदनाम व संस्थेचा शिक्का)

**बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ अन्वये बालकांच्या**
**नमुना २७**

**[नियम २२ (२) आणि २३(२) पहा]**

## काळजी घेणा-या संस्थेची नोंदणी प्रमाणपत्रासाठी करावयाचा अर्ज

प्रति,
महिला व बाल विकास विभाग,
महाराष्ट्र शासन

१. बालकांच्या काळजी घेणा-या संस्था चालविण्यास इच्छूक अर्जदार/संस्था तपशील:

(i) बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम २(२१) अनुसार संस्थेचा प्रकार .........................

(ii) संस्थेचे / संघटनेचे नाव ...........................................................................

(iii) संबंधीत अधियमांतर्गत नोंदणी झालेल्या संस्थेचा/संघटनेचा नोंदणी क्रमांक व नोंदणीचा दिनांक (सोबत जोडावे-नोंदणीसंबंधी साक्षांकित कागदपत्रे आणि नियमावली, घटनापत्रक) आणि बालकांच्या काळजीसाठी कार्यरत संस्था चालविण्यासंबधीत तरतूदी, असा संस्था चालविण्यासाठीचा प्रशासनाचा ठराव)

(iv) संस्था / संघटना चालविण्यासाठी वैधता कालावधी ..............................

(v) अर्जदार / संस्था / संघटना यांचा संपूर्ण पत्ता ...................

(vi) एसटीडी कोड / दूरध्वनि क्र. ......................................... ........

(vii) एसटीडी कोड / फॅक्स क्रमांक ......................................... ..................

(viii) ई-मेल पत्ता .......................................... .................

(ix) संस्था देशभर कार्यरत आहे का,जर होय असेल तर, अन्य **राज्यांतील** त्यांच्या शाखांचे पत्ते द्या ..................... कृपया राज्य किंवा जिल्हा नमूद करावा.

(x) संस्था / संघटनेला याआधी मान्यता नाकारण्यात आली आहे काय होय / नाही

(xi) ज्या अर्जाच्या अनुषंगाने संस्था / संघटनेला याआधी मान्यता नाकारण्यात आली त्याचा संदर्भ.

अ) नाकारण्यात आल्याची तारीख ..............................................

आ)कोणत्या विभागाकडून नोंदणी नाकारण्यात आली............ .

(xi) बालकांची काळजी घेणारी संस्था म्हणून नोंदणी नाकारण्याचे कारण ........................................

(xiii) संस्था /संघटनेला काळ्या यादीत टाकण्यात आले आहे काय: होय / नाही

२. बालकांची काळजी घेणारी संस्था म्हणून प्रस्तावित संस्थेचे तपशील

प्रस्तावित बालकांची काळजी घेणा-या  संस्थेचे नाव .....................

i. बालकांची काळजी घेणारी संस्थेचा प्रकार (कलम २(२१) अंतर्गत)..........................

ii. बालकांची काळजी घेणारी प्रस्तावित संस्था किंवा संघटनेचा संपूर्ण पत्ता / स्थान

iii. एसटीडी कोड / दूरध्वनी क्रमांक .........................

iv. एसटीडी कोड / फॅक्स क्रमांक ..............................

v. ई-मेल पत्ता .......................................... ..............................

vi. प्रस्तावित बालकांची काळजी घेणारी संस्था संस्थेचा परिसर मालकीचा आहे किंवा भाड्याने घेतला आहे (छायाचित्र जोडावेत)

३. संपर्क (प्रस्तावित बालकांच्या काळजीसाठी कार्यरत संस्थेचे नाव आणि अंतर):

(i) मुख्य रस्ता ..................

(ii) बसस्थान ......................

(iii) रेल्वे स्टेशन ...............

(iv) दवाखाना ..................

(v) शाळा ....................

(vi) व्यावसायिक प्रशिक्षण केंद्र ...

(vii) कोणतीही महत्त्वाची खूण ..............

४. पायाभूत सुविधा

(i) खोल्यांची संख्या (मापनासह उल्लेख) ................ (फोटो संलग्न करावेत)

(ii) शौचालयांची संख्या (मापनासह उल्लेख) ............ (फोटो संलग्न करावेत)

(iii) किचनची संख्या (मापनासह उल्लेख) ..............  (फोटो संलग्न करावेत)

(iv) आजारपणासाठी दरम्यान लागणा-या खोलीची संख्या ............ (फोटो संलग्न करावेत)

(iv) इमारतीच्या ब्लू प्रिंटची कॉपी (इमारतीचा अस्सल रेखाटन आराखडा) आणि भोगवटा(occupation) प्रमाणपत्र सोबत जोडावे.

(vi) अनपेक्षित आपत्तीचा सामना करण्यासाठीच्या रचनेमध्ये करण्यात आलेल्या बदलाचा  देखील

उल्लेख करावा:

(i) आग

(ii) भूकंप

(iii) इतर कोणतीही व्यवस्था

(iv) पिण्याचे पाण्याची व्यवस्था

(v) स्वच्छता आणि स्वच्छता राखण्यासाठी व्यवस्था:

(vi) कीटक नियंत्रण

(vii) कचरा विल्हेवाट

(viii) साठवणूक जागा.

(ix) इतर कोणतीही व्यवस्था

(x) भाडे करारपत्र / इमारत देखभाल खर्जाचे अंदाजपत्र (जे लागू असेल ते) (भाडे कराराची नोंदणीकृत प्रत जोडावी)

(xi) आपत्कालीन परिस्थितीत बालके व कर्मचारी यांच्यासाठी वाहतुक व्यवस्था.

५. संस्था / संघटनेची क्षमता-

i). बालकांची संख्या (०-६ वर्षे), गृहामध्ये उपस्थित / प्रस्तावित (जर असेल तर)

ii). बालकांची संख्या (६-१० वर्षे), गृहामध्ये उपस्थित / प्रस्तावित (जर असेल तर)

iii). बालकांची संख्या (११-१५ वर्षे), गृहामध्ये उपस्थित / प्रस्तावित (जर असेल तर)

iv). बालकांची संख्या (१६-१८ वर्षे), गृहामध्ये उपस्थित / प्रस्तावित (जर असेल तर)

v). बालकांची संख्या (१८-२१ वर्षे), गृहामध्ये उपस्थित / प्रस्तावित (जर असेल तर)

६. विद्यमान बालकांची काळजी घेणारी संस्थेमध्ये बालकांना ठेवण्यात येते याबाबत बाल कल्याण समिती/बाल न्याय मंडळ यांना कळविण्यात आले आहे काय, होय / नाही

७. उपलब्ध सुविधा

(i) शैक्षणिक सुविधा ............................................ ..

(ii) आरोग्य तपासणी किंवा आपत्कालीन वैद्यकीय व्यवस्था, तपासणीची वारंवारता, कोणत्या तपासण्या करण्याचे प्रस्तावित आहे.....................

(iii) मनोरंजन सुविधा / खेळण्याचे मैदान .................................

(iv) व्यावसायिक प्रशिक्षण सुविधा .......................................

(v) बालकांच्या विकासावर परिणाम करणा-या इतर कोणत्याही सुविधा.

(vi) अशा सेवांचा लाभ घेण्यासाठी मुलांच्या वाहतूकीसाठीची सुविधा.

(vii) बालकांच्या व कर्मचा-यांची देखरेख करण्यासाठी बायोमेट्रिक उपकरण कार्यरत आहे काय

होय / नाही

८. कर्मचारी तपशील

(i) नाव आणि पदनामासह कर्मचा-यांची तपशीलवार यादी ................................

(ii) कर्मचा-यांचे शिक्षण आणि अनुभव ......................................... ...

(iii) भागीदार संस्थेचे नाव

(iv) संस्थेच्या मुख्य पदाधिका-याचे नाव

(iv) मुलींसाठी कार्यरत सर्व संस्थांच्या बाबतीत सर्व महिला कर्मचारी अनिवार्य आहेत.

९. अर्जदाराची पार्श्वभूमी (संस्था / संघटना)

(i) मागील तीन वर्षांत संस्थेचे प्रमुख उपक्रम (वार्षिक अहवालाची प्रत जोडावी)

(ii) व्यवस्थापकीय समिती / नियामक मंडळ यांच्या नावाची यादी सोबत जोडलेल्या नमून्यात (नियामक मंडळाचा वार्षिक ठराव सोबत जोडावा)

(iii) संस्थेची मालमत्ता / पायाभूत सुविधा याची यादी.

(iv) संस्था, परदेशी योगदान (विनियमन) अधिनियम, १९७६ अंतर्गत नोंदणीकृत आहे काय( नोंदणीचे प्रमाणपत्र सोबत जोडावे)

(v) मागील दोन वर्षात मिळालेल्या परदेशी देणग्यांचा तपशील (संलग्न-संबंधित कागदपत्रे)

(vi) इतर मार्गाने मिळालेल्या अनुदानाचा स्त्रोत (जर असेल तर), योजना / प्रकल्पाचे नाव, उद्देश रक्कम, इत्यादीं.

(vii) निधीच्या इतर स्त्रोतांची यादी (जर असेल तर) .

(viii) एजन्सीचे आस्तित्वात असलेल्या बँक खात्याचा तपशील, शाखा कोड खाते क्र.

(ix) प्रस्तावित अनुदानासाठी एक स्वतंत्र बँक खाते उघडण्यासाठी एजन्सी सहमत आहे की नाही

(x) अर्ज केल्यानंतर लगेचच किमान सरासरी रु. २,००,००० / - इतकी शिल्लक असावी.

(xii) जोडपत्र - मागील तीन वर्षांच्या खात्याचे छायाचित्र सोबत जोडावे :

i. लेखापरिक्षण अहवाल
ii. उत्पन्न आणि खर्च खाते
iii. पावती आणि देयक खाते
iv. संस्थेचा ताळेबंद

मी असे घोषित करतो की, बालकांची काळजी घेणारी संस्था बाल संरक्षण धोरण आणि बाल न्याय अधिनियम,२०१५ व हे नियम याप्रमाणे कार्य करील.

मी घोषित करतो की प्रशासकीय मंडळ /व्यवस्थापन समिती यावर कार्यरत _____ सदस्य केंद्र / राज्य सरकारचा कर्मचारी म्हणून कार्यरत आहेत, आणि त्यांना योग्य प्राधिका-यांकडून ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे आणि बालकांची काळजी घेणारी संस्थेकडून त्यांना नगद किंवा प्रकारची कोणतीही फायदे प्राप्त होणार नाही.

मी जाहीर करतो की, संस्थेशी संबंधीत कोणत्याही व्यक्तीचा यापुर्वी अनैतिक कृती, बालकांचे शोषण किंवा बाल कामगार ठेवणे अशा अपराधामध्ये समावेश असल्याचे आढळून आले नाही. तसेच या संस्थेला केंद्र किंवा राज्य सरकारद्वारे कधीच काळ्या यादीत टाकण्यात आले नाही.

मी हे घोषित करतो की, बालकांची काळजी घेणारी संस्थेचा आणि त्याच्या परिसराचा उपयोग केवळ या अर्जाच्या मुद्दा क्र. २ (ii) मध्ये नमूद केलेल्या उद्देश्यासाठी करण्यात येईल.

बालकांची काळजी घेणारी संस्थेची मुळ परिसरातून इतर ठिकाणी स्थलांतरण करण्याआधी महिला व बाल विकास विभागाच्या योग्य प्राधिका-याची परवानगी घेतली जाईल.

व्यवस्थापन समिती / प्रशासकीय मंडळामध्ये वेळोवेळी कोणतेही बदल झाल्यास याबाबत महिला व बाल विकास विभागाच्या योग्य प्राधिकरण अवगत केले जाईल.

मी, बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम,२०१५ आणि बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) नियम, २०१६ वाचले आणि समजून घेतले आहेत.

........................... (संघटन/ संस्थेचे नाव) बालकांची काळजी घेणारी संस्था म्हणून नोंदणी व्हावी यासाठी बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) अधिनियम, २०१५ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (बालकांची काळजी व संरक्षण) नियम, २०१८ मधील सर्व आवश्यक बाबींची पूर्तता केली आहे.

मी या संदर्भात केंद्रीय / राज्य अधिनियम, नियम, मार्गदर्शक तत्त्वे, परिपत्रके आणि अधिसूचना आणि वेळोवेळी अधिसूचित केल्या जाणा-या सर्व अटींचे पालन करण्याचा प्रयत्न करीन.

बालकांची काळजी, संरक्षण आणि पुनर्वसन यासाठी बाल कल्याण समिती व बाल न्याय मंडळ यांच्या आदेशाचे पालन करीन .

अधिकृत स्वाक्षरीकर्त्याची सही: ............................

नाव: .......................................... पदनाम: .. ............. पत्ता................................. .................
जिल्हा ................. तारीख .......... .. कार्यालय शिक्का:

स्वाक्षरी: साक्षीदारांची क्र.१: ....................... स्वाक्षरी: साक्षीदारांची क्र.२: ........ ........................

**बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता प्राप्त झालेल्या नोंदणीप्रमाणपत्र प्रस्तावांचे छाननी पत्राचा नमुना**

---------------------------------------------------------------------------------------------------(नाव व संपूर्ण पत्ता) या संस्थेचे पत्र क्र ---------------- दिनांक -------------------- अन्वये बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ कलम ४१ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना क्रमांक २७ नुसार प्राप्त झालेल्या अर्जान्वये ------------------- या जिल्हयातील ----------------------या महानगरपालिका क्षेत्रासाठी खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता नोंदणी प्रमाणपत्राचा प्रस्ताव नमुना क्रमांक २७ मध्ये या कार्यालयास दिनांक ----------------- रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता प्रस्तावा सोबत पुढील कागदपत्रे आढळून आली

| अ. क्र | तपशील | पान क्रं. --- - ते -- | एकूण पाने |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४३ (१) अंतर्गत नमुना क्र २७ मधील अर्ज | | |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ३ | संस्थेची घटना व नियमावली | | |
| ४ | संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी | | |
| ५ | संस्थेच्या विश्वस्तांची यादी | | |
| ६ | नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी संस्थेचा ठरावाची प्रत | | |
| ७ | . संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्र. सन २०१८-१९ लेखा परिक्षण अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे सरप्लस किती डिफीसेट किती याबाबत विवरण जोडावे | | |
| | संस्थेच्या मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल. | | |
| | संस्थेचा मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल (सामाजिक किंवा सार्वजनिक सेवेच्या किंवा सामान्यत: किंवा विशेषत: बालकाचे संगोपन, संरक्षण, विकास, पुर्नवसन, सामाजिक पुर्नएकात्मिकरण यांच्याशी संबंधीत दिलेल्या सेवांच्या बाबतीतला अहवाल) | | |
| ८ | अनैतिक कृत्य, बाल अत्याचार, बाल कामगार ठेवणे इत्यादी कृत्यासंबंधी आधीच्या कोणत्याही दोषसिदधीच्या पुर्वोतिहाशी किंवा त्यातील सहभाग संबंधातील एखाद्या व्यक्तिचे किंवा संघटनेचे अभिकथन | | |
| ९ | संस्थेकडील मागील ६ महिन्याचे बँक विवरण पत्र (बँकेच्या सही व शिक्क्यासह) | | |
| १० | संस्थेकडे असणाऱ्या पायाभूत सुविधांचे सविस्तर माहितीसह छायाचित्रे. २५ बालकांसाठीच्या युनिट करिता कमीत कमी २००० स्क्वे. फुट क्षेत्रफळ (स्वयंपाकगृह, दोन स्नानगृट व दोन शौचालया सह) | | |
| ११ | केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने काळया यादीत टाकलेले नाही असे प्रतिज्ञापत्र तसेच संस्थेतील पदाधिका री यांचेवर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे संबधित यंत्रणेचे प्रमाणपत्र | | |
| १२ | मागील ३ वर्षामध्ये संस्थेने रस्त्यावरील बालकांच्या संदर्भात राबविलेले उपक्रम व त्याकरीता केलेल्या खर्चाचा तपशील | | |
| १३ | कर्मचारी वर्गाची यादी | | |
| १४ | संस्थेने दिलेल्या घोषणापत्रे १)बाल संरक्षण धोरण व अधिनियमाचे पालन. <br>१) प्रशासकीय मंडळ किंवा व्यवस्थापन समिती यावर केंद्र किंवा राज्य कर्मचारी म्हणुन कार्यरत असल्यास योग्य प्राधिकाऱ्याचे नाहरकत प्रमाणपत्र. <br>२) संस्थेची संबंधीत व्यक्तिचा कोणत्याही अपराधामध्ये समावेश नसल्याबाबतचे प्रमाणपत्र. ३)संस्थेच्या व्यवस्थापन समिती किंवा प्रशासकीय मंडळामध्ये बदल झाल्यास प्राधिकरणास अवगत करणेबाबत. ४)याव्यतिरिक्त इतर घोषणापत्रे. | | |
| १५ | जिल्हा महिला कार्यालयाचा तपासणी अहवाल | | |

# पोहोच पावती

पावती देण्यात येते की, -------------------------- या संस्थेने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४१ (१) आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ अन्वये खुले निवारागृह चालविण्याकरीता मान्यता मिळणेबाबत कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्राथमिक छाननी माझे कार्यालयाकडून करण्यात आली असून वर नमुद केलेनुसार सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे. तसेच संस्थने महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना क्र २७ नुसार नियमात नमूद केलेनुसार आवश्यक कागदपत्रे जोडून खुले निवारागृह मान्यतेचा प्रस्ताव सादर केला आहे. यात पुढीलप्रमाणे कागदपत्रे जोडण्यात आलेली आहेत.

| अक्र | तपशील | पान क्रमांक<br>----- ते ---- | एकूण पाने |
|---|---|---|---|
| १ | संस्थेचा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४३ (१) अंतर्गत नमुना क्र २७ मधील अर्ज | | |
| २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र | | |
| ३ | संस्थेची घटना व नियमावली | | |
| ४ | संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी | | |
| ५ | नोंदणी प्रमाणपत्र आणि खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी मान्यता घेण्याबाबत संस्थेचा ठरावाची प्रत | | |
| ६ | संस्थेतील कार्यरत कर्मचारी तसेच खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यासाठी प्रस्तावित कर्मचाऱ्यांची यादी पदनाम व वेतनासह | | |
| ७ | संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्र. सन २०१८-१९ लेखा परिक्षण अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे सरप्लस किती डिफीसेट किती याबाबत विवरण जोडावे | | |
| ८ | संस्थेचा मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल | | |
| ९ | संस्थेकडील मागील ६ महिन्याचे बँक विवरण पत्र (बँकेच्या सही व शिक्क्यासह) | | |
| १० | संस्थेकडे असणाऱ्या पायाभूत सुविधांचे सविस्तर माहितीसह छायाचित्रे. २५ बालकांसाठीच्या युनिट करिता कमीत कमी २००० स्क्वे. फुट क्षेत्रफळ (स्वयंपाकगृह, दोन स्नानगृट व दोन शौचालया सह) | | |
| ११ | ज्या क्षेत्राकरीता खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यात येणार आहे त्या क्षेत्रामध्ये रस्त्यावरील बालकांबाबत केलेले सर्व्हेक्षण | | |
| १२ | मागील ३ वर्षामध्ये संस्थेने रस्त्यावरील बालकांच्या संदर्भात राबविलेले उपक्रम व त्याकरीता केलेल्या खर्चाचा तपशील | | |
| १३ | संस्था काळया यादीत नसल्याचे तसेच संस्थेतील पदाधिकारी यांचेवर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे संबधित यंत्रणेचे प्रमाणपत्र | | |
| १४ | महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना क्र २७ नुसार नियमात नमूद केलेनुसार आवश्यक कागदपत्रे जोडून नोंदणी प्रमाणपत्र मान्यतेचा स्वतंत्र प्रस्ताव | | |
| १५ | जिल्हा महिला कार्यालयाचा तपासणी अहवाल | | |

सदर प्रस्तावात क्र ------------- ते ------------- इतकी एकूण---------- पाने आहेत.

करीता सदर पोहोच पावती देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**

**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी**

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, --------------------------- या संस्थेने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४३ (१) आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियम २३ अन्वये खुले निवारागृह चालविण्याकरीता मान्यता मिळणेबाबत कार्यालयास विहित मुदतीत प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्राथमिक छाननी माझे कार्यालयाकडून करण्यात आली असून वर नमुद केलेनुसार सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे. तसेच संस्थने महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नमुना क्र २७ नुसार नियमात नमूद केलेनुसार आवश्यक कागदपत्रे जोडून नोंदणी प्रमाणपत्र मान्यतेचा स्वतंत्र प्रस्ताव सादर केलेला आहे. खुल निवारागृह प्रस्तावात क्र ------------- ते ------------- इतकी एकूण---------- पाने आणि नोंदणी प्रमाणपत्र प्रस्तावात क्र ---------------- ते ------------ इतकी एकूण -----------पाने आहेत.

स्वाक्षरी
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता प्रस्तावाचा नमुना

**Department of Woman & child Development Govt. of Maharashtra**

# Maharashtra State Child Protection Society, Pune

PERFORMA FOR NGOS APPLYING FOR OPEN SHELTER UNDER INTEGRATED CHILD PROTECTION SCHEME

1. Name of the Organization : ------------------------------------------------------------------
2. Postal Address :------------------------------------------------------------------

   PIN: ------------- District: --------------------------
3. Telephone :-Telex Fax E-mail : -----------------
4. Mobile No.
5. Legal Status : ( ) Society ( ) Company ( ) Trust

   Others (Specify)
6. Registration Details : Registered on (Date)

   By----------------------------------------------------------------------------
7. Registered Office Address : ---------------------------------------------

   ---------------------------------------------

   ---------------------------------------------
8. Contact Person :-----------------------------------------------

   Designation :-----------------------------------------------

9. Staff Strength

| S.N. | Name of the Staff | Designation | Qualification | Temporary/Permanent | Salary |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

10. Assets/Infrastructure of the organization

| S.N. | Particulars | Worth in rupees | Remarks |
|---|---|---|---|
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |
| | | | |

11.a. Please Provide details, regarding the annual of your organization.

| Year | Source | Amount | Expenditure |
|---|---|---|---|
| 2018-19 | | | |
| 2017-18 | | | |
| 2016-17 | | | |
| | | | |

11.b. Details of Appreciation Letter(s) or Blacklisting or Complaint received.

(Please provide the supporting documents)

12. Provide the details of the current projects for children in need of care & protection in the following format:

| Sr. No. | Project Name | Location | Funded by | Year | Types of beneficiaries (Beggars, street and working children, ragpickers, small vendors, orphaned, deserted, trafficked, run away children etc. | Total no. of beneficiaries |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

1. Please provide basic information on the key projects carried out by your organization since the last three years (5 lines for each subject – attach separately).
    - Community served.
    - Experience of working with Children in need of care and protection.
    - Objectives.
    - Strategies.
    - Main outcomes.
    - Evaluation methods employed.
    - Evaluation results.
    - Survey and work experience with target group.

2. A brief write up on the programmes the organization currently runs
*(Not more than three pages)*

3. Submit your proposal for open shelter reflecting the following points:

a) Methods of identification of the target group (children in need of Care and Protection)

b) Outreach activities to make contact with the children within geographical area/location.

c) Geographical location of open shelter proposed justifying the accessibility to the target group round the clock.
d) Innovative after care protection measures to make the child self-sufficient & self-reliant.
e) The specific plans for the sustainability of the project beyond the funding period.
f) Realistic budget tied to measurable outcomes.

4. Copies of the following documents need to be provided.
   - Society Registration Certificate and Memorandum of Association & Articles along with the latest filled return/Trust Deed.
   - Activity Report/Annual report of the organization for the last three years.
   - Annual Audit Report of the organization for the last three years.
   - Income Tax Registration and Exemption Certificate if any.
   - FCRA Registration Certificate if any.
   - List of Board/Governing Body members with Contact details and occupation

5. Name of the person who filled this form:

   Qualification and experience :

   Designation :

   Address :

   Mobile No. :

**खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता प्राप्त प्रस्तावांचे छाननी पत्राचा नमुना**
**(दोन्ही अर्जासोबत आवश्यक ती कागदपत्रे स्वतंत्ररित्या जोडण्यात यावीत)**

----------------------------------------------------------------------------------------------(नाव व संपूर्ण पत्ता) या संस्थेचे पत्र क्र ---------------- दिनांक -------------------- अन्वये ------------------- या जिल्हयातील ----------------------या महानगरपालिका क्षेत्रासाठी खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता अर्ज या कार्यालयास दिनांक ----------------- रोजी प्राप्त झाला आहे. सदर प्रस्तावाची तपासणी केली असता प्रस्तावा सोबत पुढील कागदपत्रे आढळून आली

| **अ.क्र** | **तपशील** | **पान क्रं----- ते ----** | **एकूण पाने** |
|---|---|---|---|
| १ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र. | | |
| २ | संस्थेची घटना व नियमावली. | | |
| ३ | संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्र. सन २०१८-१९ लेखा परिक्षण अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे सरप्लस किती डिफीसेट किती याबाबत विवरण जोडावे | | |
| ४ | संस्थेचा मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल. | | |
| ५ | आयकर नोंदणी प्रमाणपत्र व सवलत प्रमाणपत्र (३५एसी, ८०जी इ.) असल्यास त्याची प्रत (अनिवार्य नाही). | | |
| ६ | एफसीआरए नोंदणी प्रमाणपत्र असल्यास त्याची प्रत (अनिवार्य नाही). | | |
| ७ | संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी व संपर्कव्यक्तींचे विवरण. | | |
| ८ | ज्या क्षेत्राकरीता खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यात येणार आहे त्या क्षेत्रामध्ये रस्त्यावरील बालकांबाबत केलेले सर्व्हेक्षण. | | |
| ९ | मागील ३ वर्षामध्ये संस्थेने रस्त्यावरील बालकांच्या संदर्भात राबविलेले उपक्रम व त्याकरीता केलेल्या खर्चाचा तपशील. | | |
| १० | अर्जातील मुद्दा क्र १४ मधील संस्थेच्या कामाचे विवरण | | |
| ११ | अर्जातील मुद्दा क्र १५ मधील ए ते एफ पर्यंतची माहिती | | |

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, --------------------------- या संस्थेने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियमामधील नमुना क्रमांक २७ नुसार प्राप्त झालेल्या अर्जान्वये संस्थेने अधिनियमाचा कलम २३ अन्वये खुले निवारागृह चालविण्याकरीता नोंदणीप्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्ताव या कार्यालयास सादर केला असुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्राथमिक छाननी माझे कार्यालयाकडून करण्यात आली असून वर नमुद केलेनुसार सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे. नोंदणी प्रमाणपत्र प्रस्तावात क्र ---------------- ते ------------ इतकी एकूण -----------पाने आहेत.

स्वाक्षरी
जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी

# पोहोच पावती

पावती देण्यात येते की, --------------------------- या संस्थेने बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ आणि महाराष्ट्र राज्य बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) नियम २०१८ मधील नियमामधील नमुना क्रमांक २७ नुसार प्राप्त झालेल्या अर्जान्वये संस्थेने अधिनियमाचा कलम २३ अन्वये खुले निवारागृह चालविण्याकरीता नोंदणीप्रमाणपत्र मिळणेबाबत प्रस्ताव या कार्यालयास सादर केला असुन प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्राथमिक छाननी माझे कार्यालयाकडून करण्यात आली असून वर नमुद केलेनुसार सर्व कागदपत्रे प्रस्तावासोबत जोडण्यात आल्याची खात्री करण्यात आली आहे. नोंदणी प्रमाणपत्र प्रस्तावात क्र ---------------- ते ------------ इतकी एकूण -----------पाने आहेत. करीता सदर पोहोच पावती देण्यात येत आहे.

**स्वाक्षरी**
**जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी**

| अ.क्र. | अर्ज क्र | कशासाठी | | आवश्यक कागदपत्रे |
|---|---|---|---|---|
| १ | **अर्ज क्रमांक १** | **बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम २०१५ च्या कलम ४१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी** | १ | संस्थेचा बाल न्याय (मुलांची काळजी व संरक्षण) अधिनियम ४३ (१) अंतर्गत नमुना क्र २७ मधील अर्ज |
| | | | २ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र |
| | | | ३ | संस्थेची घटना व नियमावली |
| | | | ४ | संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी |
| | | | ५ | संस्थेच्या विश्वस्तांची यादी |
| | | | ६ | नोंदणी प्रमाणपत्र मिळण्यासाठी संस्थेचा ठरावाची प्रत |
| | | | ७ | संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्र. सन २०१८-१९ लेखा परिक्षण अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे सरप्लस किती डिफीसेट किती याबाबत विवरण जोडावे |
| | | | ८ | संस्थेच्या मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल. |
| | | | ९ | संस्थेचा मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल (सामाजिक किंवा सार्वजनिक सेवेच्या किंवा सामान्यत: किंवा विशेषत: बालकाचे संगोपन, संरक्षण, विकास, पुर्नवसन, सामाजिक पुर्नएकात्मिकरण यांच्याशी संबंधीत दिलेल्या सेवांच्या बाबतीतला अहवाल) |
| | | | १० | अनैतिक कृत्य, बाल अत्याचार, बाल कामगार ठेवणे इत्यादी कृत्यासंबंधी आधीच्या कोणत्याही दोषसिदधीच्या पुर्वोतिहाशी किंवा त्यातील सहभाग संबंधातील एखाद्या व्यक्तिचे किंवा संघटनेचे अभिकथन |
| | | | ११ | संस्थेकडील मागील ६ महिन्याचे बँक विवरण पत्र (बँकेच्या सही व शिक्क्यासह) |
| | | | १२ | संस्थेकडे असणाऱ्या पायाभूत सुविधांचे सविस्तर माहितीसह छायाचित्रे. २५ बालकांसाठीच्या युनिट करिता कमीत कमी २००० स्क्वे. फुट क्षेत्रफळ (स्वयंपाकगृह, दोन स्नानगृह व दोन शौचालया सह) |
| | | | १३ | केंद्र सरकारने किंवा राज्य शासनाने काळया यादीत टाकलेले नाही असे प्रतिज्ञापत्र तसेच संस्थेतील पदाधिका री यांचेवर कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे संबधित यंत्रणेचे प्रमाणपत्र |
| | | | १४ | संस्थेने दिलेल्या घोषणापत्रे<br>१) बाल संरक्षण धोरण व अधिनियमाचे पालन.<br>२) प्रशासकीय मंडळ किंवा व्यवस्थापन समिती यावर केंद्र किंवा राज्य कर्मचारी म्हणुन कार्यरत असल्यास योग्य प्राधिकाऱ्याचे नाहरकत प्रमाणपत्र.<br>३) संस्थेची संबंधीत व्यक्तिचा कोणत्याही अपराधामध्ये समावेश नसल्याबाबतचे प्रमाणपत्र.<br>४) संस्थेच्या व्यवस्थापन समिती किंवा प्रशासकीय मंडळामध्ये बदल झाल्यास प्राधिकरणास अवगत करणेबाबत.<br>५) याव्यतिरिक्त इतर घोषणापत्रे. |
| | | | १५ | जिल्हा महिला कार्यालयाचा तपासणी अहवाल |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| **२** | **अर्ज क्रमांक २** | **खुले निवारागृह (Open Shelter) चालविण्याकरीता अर्ज (इंग्रजी)** | १ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र. |
| | | | २ | संस्थेची घटना व नियमावली. |
| | | | ३ | संस्थेचे मागील ३ वर्षाचे लेखा विवरण पत्र. सन २०१८-१९ लेखा परिक्षण अहवालानुसार संस्थेची आर्थिक स्थिती कशी आहे सरप्लस किती डिफीसेट किती याबाबत विवरण जोडावे |
| | | | ४ | संस्थेचा मागील ३ वर्षाचा वार्षिक अहवाल. |
| | | | ५ | आयकर नोंदणी प्रमाणपत्र व सवलत प्रमाणपत्र (३५एसी, ८०जी इ.) असल्यास त्याची प्रत (अनिवार्य नाही). |
| | | | ६ | एफसीआरए नोंदणी प्रमाणपत्र असल्यास त्याची प्रत (अनिवार्य नाही). |
| | | | ७ | संस्थेच्या कार्यकारी मंडळाची यादी व संपर्कव्यक्तींचे विवरण. |
| | | | ८ | ज्या क्षेत्राकरीता खुली निवारागृहे (OpenShelter) चालविण्यात येणार आहे त्या क्षेत्रामध्ये रस्त्यावरील बालकांबाबत केलेले सर्व्हेक्षण. |
| | | | ९ | मागील ३ वर्षामध्ये संस्थेने रस्त्यावरील बालकांच्या संदर्भात राबविलेले उपक्रम व त्याकरीता केलेल्या खर्चाचा तपशील. |
| | | | १० | अर्जातील मुद्दा क्र १४ मधील संस्थेच्या कामाचे विवरण |
| | | | ११ | अर्जातील मुद्दा क्र १५ मधील ए ते एफ पर्यंतची माहिती |